नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - २२७<br>Issue - 227 | वार मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६<br>Blow- Tuesday Date 6 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## महाराष्ट्रात पुन्हा थंडीची लाट

### राज्यातील हवामानात झपाट्याने बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: नववर्षाच्या सुरुवातीपासूनच राज्यातील हवामानात झपाट्याने बदल होताना दिसत आहेत. राज्यभरात थंडीचा कडाका काहीसा कमी झाला असला, तरी जानेवारीच्या पहिल्याच दिवशी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, पालघर आणि कोकण किनारपट्टीवर पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली होती. मात्र आता पावसाने बॅक सीट घेतली असून, थंडीचाही जोर काहीसा कमी झाला आहे.



मुंबईत आज, ५ जानेवारी रोजी, किमान तापमान १९ अंश सेल्सियस तर कमाल तापमान ३२ अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज आहे. येत्या आठवड्याभरात मुंबईसह कोकण किनारपट्टीवर सकाळी धुके तर दिवसभर कोरडं वातावरण राहील. मुंबईप्रमाणेच पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातही हवामान कोरडं राहणार आहे. पुण्यात आज सोमवारी कमाल तापमान २९ अंश सेल्सियस तर किमान तापमान १६ अंश सेल्सियस राहील. पुढील आठवड्यात पहाटे धुके आणि गारवा जाणवेल, मात्र दिवसभर थंडीचा कडाका कमी होत जाण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यात प्रामुख्याने कोरडं वातावरण आणि निरभ्र आकाश राहणार आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सोमवारी किमान तापमान १५ अंश सेल्सियस तर कमाल तापमान २९ अंश सेल्सियस राहील. तसेच उत्तर महाराष्ट्र, नाशिक आणि नागपूरमध्येही संपूर्ण आठवडाभर हवामानाची स्थिती साधारण अशीच राहण्याचा अंदाज आहे. अमरावती जिल्ह्यात किमान तापमान १४अंश सेल्सियस तर कमाल तापमान ३० अंश सेल्सियस राहणार आहे.

दरम्यान, संपूर्ण राज्यभरात थंडीचा कडाका कमी होऊन दुपारी आणि सायंकाळी वातावरणातील गारवा कमी जाणवेल. मात्र, येत्या काही दिवसांत राज्यात पुन्हा थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. येण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. खचऊने नागरिकांना रात्री आणि पहाटे थंडीची जाणीव होऊ शकते, त्यामुळे आवश्यक ती काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.

महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये दाट धुक्याची शक्यता असून, त्यामुळे दृश्यमानता कमी होईल आणि रस्ते, रेल्वे व हवाई वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अधिकाऱ्यांनी इशारा दिला आहे की, उत्तर भारतात धुक्यामुळे होणाऱ्या व्यत्ययांमुळे गाड्यांना विलंब होऊ शकतो किंवा त्या रद्द केल्या जाऊ शकतात.

## शिवशाही बस अन् दुचाकीचा भीषण अपघात; तीन युवक जागीच ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा : रस्ते महामार्गावरील अपघातांच्या घटना काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. आता, बुलढाणा-छत्रपती संभाजी नगर महामार्गावरील धाड गावाजवळ जवळ एसटी बस आणि दुचाकीचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली. बस आणि दुचाकीची समोरासमोर धडक बसल्याने हा अपघात झाला असून अपघातात दुचाकीवरील तीन युवकांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघाताच्या घटनेनंतर स्थानिक पोलीस प्रशासनाला माहिती देण्यात आली. तर, स्थानिकांना धाव घेत रुग्णवाहिकेलाही पाचारण केले. मात्र, रुग्णालयात नेण्यापूर्वीच तिघांचा मृत्यू झाला होता.

छत्रपती संभाजी नगरहून बुलढाण्याकडे जाणाऱ्या शिवशाही बसला भरधाव दुचाकी धडकली, या दुचाकीवरुन तीन जण प्रवास करत होते. धाड गावाजवळ या दुचाकीने बसला जोराची धडक दिल्याने टु व्हिलरवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केले, रुग्णवाहिकेलाही पाचारण करण्यात आले. मात्र, दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. बुलढाणा तालुक्यातील ढाल सावंगी गावातील कैलास दांडगे, रवी चंदनशिव व अंकुश पाडळे अशी मृत्यूमुखी पडलेल्या युवकांची नावे आहेत. विशेष म्हणजे हे तीनही तरुण २० वर्षे वयाच्या आतीलच असल्याची माहिती आहे. दरम्यान, अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती, तर अपघातस्थळी मोठी गर्दी झाल्याचंही पाहायला मिळालं.

बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा-बुऱ्हाणपूर मार्गावर वडाप टॅक्सीचा भीषण अपघात झाल्याची दुसरी घटना घडली आहे. भरधाव टॅक्सी मार्गालगत खड्ड्यात पलटी झाल्याने टॅक्सीतील दहा जण गंभीर जखमी झाले आहेत.

या सर्व जखमींना खामगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आलं आहे. दरम्यान, अपघातानंतर नांदुरा बुऱ्हानपूर मार्गावरील वाहतूक ठप्प झाली असून पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

## भाजप-शिंदे गटाची अजस्त्र प्रचारयंत्रणा निष्प्रभ करायला उद्धव ठाकरेंनी ४० मोहरे निवडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून ४० जणांची स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यासोबत संजय राऊत, अरविंद सावंत, अनिल परब, भास्कर जाधव, सुषमा अंधारे, वरूण सरदेसाई, अंबादास दानवे, अनिल देसाई, विनायक राऊत, आनंद दुबे, आदेश बांदेकर यांच्या नावाचा समावेश आहे. दरम्यान, राज्यात २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे.




**ठाकरेंच्या शिवसेनेकडून ४० जणांची स्टार प्रचारकांची यादी–** उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, शुभाष देसाई, संजय राऊत, अनंत गीते, चंद्रकांत खैरे, अरविंद सावंत, भास्कर जाधव, अनिल देसाई, विनायक राऊत, अनिल परब, राजन विचारे, सुनील प्रभू, आदेश बांदेकर, वरुण सरदेसाई, अंबादास दानवे, रवींद्र मिरलेकर, नितीन पाटील, राजकुमार बाफना, प्रियांका चतुर्वेदी, सचिन अहिर, लक्ष्मण वाढले, मनोज जामसुतकर, नितीन देशमुख, सुषमा अंधारे, संजय जाधव, ज्योती ठाकरे, जयश्री शेळके, जान्ह्वी सावंत, शरद कोळी, ओमराजे निंबाळकर, सुनील शिंदे, हारुन खान, सिद्धार्थ खरात, वैभव नाईक, आनंद दुबे, अशोक तिवारी, राम साळगावकर, प्रियांका जोशी, अनिश गाढवे

मुंबई पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची पहिली संयुक्त सभा विक्रोळी येथे होणार आहे. आगामी काळात दोन्ही नेत्यांच्या सात ते आठ संयुक्त सभा नियोजित असून, त्यातील पहिली सभा आज पूर्व उपनगरात होत आहे. विशेष म्हणजे, शिवसेना आणि मनसेच्या शाखांना देखील उद्धव आणि राज ठाकरे एकत्रितपणे भेटी देणार आहेत. तर दुसरीकडे, अमित ठाकरे आणि आदित्य ठाकरेही मुंबईत दोन संयुक्त सभा घेणार आहेत.

## ‘बिनविरोध’ संकल्पना लोकप्रतिनिधी कायद्यात नाही; मनसे व काँग्रेसची हायकोर्टात याचिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नगरपालिका निवडणुकानंतर आता महापालिका निवडणुकांमध्येही बिनविरोधचे वारे वाहिले असून भाजप-शिवसेना महायुतीच्या तब्बल ७० जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. या निवडीनंतर विरोधकांनी आक्षेप घेत न्यायालयात धाव घेतली आहे. ठाण्यातील मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी पत्रकार परिषद घेऊन ठाणे आणि कल्याण डोंबिवलीतील बिनविरोध निवडणुका ह्या धमक्या, पैशाचे आमिष देऊन करण्यात आल्याचे आरोप करत काही पुरावेही दिले आहेत. त्यानंतर, जाधव यांनी पुण्यातील विधिज्ञ ॲड. असीम सरोदे यांच्याशी फोनवरुन यासंदर्भात चर्चा केल्याचे स्वत: सरोदे यांनी सांगितले. तसेच, महापालिका निवडणुकांतील बिनविरोधप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

मनसे नेते अविनाश जाधव यांचा मला फोन आला होता, राज ठाकरे यांनी महापालिकेत बिनविरोध आलेल्या उमेदवारांबाबत नाराजी व्यक्त केल्याचं त्यांनी सांगितलं. न्यायालयातून याबद्दल तोडगा काढला पाहिजे, ६८ ते ७० जागा राज्यातून बिनविरोध झाल्या आहेत. ५० जागा भाजप, २० जागा शिंदे यांच्या आणि काही इतरही आहेत. महाराष्ट्राला या नवीन वर्षात राजकीय भ्रष्ट गिफ्ट मिळालं आहे. राज्य निवडणूक आयोगानेसुद्धा आता अशा जागांची चौकशी करायला सुरुवात केली आहे. मात्र, निवडणूक आयोग बायस आहे, ते सत्ताधारी पक्षाकडून बोलतात असं अविनाश जाधव यांनी सांगितलं, असे असीम सरोदे म्हणाले.



स्थानिक पातळीवर, स्थानिक नेत्यांनी, स्थानिक विषयांना धरून निवडणूक लढवली पाहिजे. पण, स्थानिक हा शब्द त्यातून वगळला आहे. सोलापूरमधील मनसेचे नेते बाळासाहेब सरवदे यांचाही बिनविरोध, अर्ज माघारी घेण्यावरुन खून झाला आहे. त्यामुळे, निवडणूक आयोगाच्या आख्यारीत हा विषय न ठेवता उच्च न्यायालयात हा विषय गेला पाहिजे. महाराष्ट्रात नगरसेवकांची खरेदी-विक्री तयार झाली असून भ्रष्ट मार्गातून या निवडणुका होत आहेत का? असा सवाल सरोदे यांनी विचारला आहे. तर, यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली गेली आहे, १६ तारखेपूर्वी म्हणजे निवडणूक निकालापूर्वी ही याचिका बोर्डावर आली पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. कारण, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंगल्यावर जाताना एक उमेदवार दिसतो, त्याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून असे अनेक व्हिडिओ आहेत, त्याचे काही पुरावे ठेवले जात नाहीत. पैशांचा वापर होतो, गुन्हेगारी वापरली जाते आहे. पुण्यातील २ बिनविरोध झालेल्या उमेदवारांच्या नावानेसुद्धा काँग्रेसचे समीर गांधी यांनी कोर्टात धाव घेतली आहे, अशी माहिती असीम सरोदे यांनी दिली.

दरम्यान, बिनविरोध निवडणुकीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव आणि काँग्रेसचे समीर गांधी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांना पैसे देऊन आणि दबाव टाकून उमेदवारी मागे घ्यायला भाग पडल्याचा दावा याचिकेत करण्यात आला. बिनविरोध संकल्पना लोकप्रतिनिधी कायद्यात नाही, असेही याचिकेत म्हटले. लोकप्रतिनिधी कायद्यात निवडून आलेले लोकप्रतिनिधी असा स्पष्ट उल्लेख असून बिनविरोध विजयी उमेदवारांना पडलेल्या मतांची किमान टक्केवारी निश्चित करण्याची मागणी याचिकेतून केली आहे. निवडणूक आयोगाच्या पक्षपातीपणावर बोट ठेवत निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवरच सवाल उपस्थित करण्यात आले. निवडणूक आयोग राज्यसरकारच्या दबावाखाली आहे, उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली याची चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला देण्याची मागणी याचिकेत केली आहे.

### रवींद्र चव्हाणांच्या वक्तव्यानंतर काँग्रेसचा संताप

## लातूरमधून विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील यात शंका नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लातूरमध्ये केलेल्या एका वक्तव्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे. भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता लातूरमधून विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील यात शंका नाही असं रवींद्र चव्हाण म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावर काँग्रेसकडून निषेध व्यक्त केला जात आहे.



लातूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्त्यांच्या मेळाव्यासाठी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे शहरात आले होते. त्यावेळी त्यांनी काँग्रेसचे दिवंगत नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुखांवर एक वक्तव्य केल्यानंतर एकच खळबळ उडाली.

या मेळाव्यास भाजप नेते आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश कराड, माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याच कार्यक्रमात महापालिका निवडणुकीसाठीच्या भाजपच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून लक्षात येते की लातूर शहरातून विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील, यात काही शंका नाही.

रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यावर हर्षवर्धन सपकाळांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, स्व. विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी लातूर जिल्ह्यातून पुसू शकणारा अजून कोणी निर्माण नाही झाला. अनेक जण इच्छा बाळगून आलेत आणि स्वाभिमानी लातूरकरांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्याला राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून दिली, त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य लातूरच्या विकासासाठी समर्पित केलं. आज त्यांच्याबद्दल हे सत्तेचा माज असलेले भाजप नेते लातूरात येऊन बरळून जातात की साहेबांच्या आठवणी पुसल्या गेल्यात. त्यांना काय समजणार विलासराव देशमुख साहेबांचं लातूर शी असलेलं नातं. लातूरच्या कर्तुत्वसंपन्न सुपुत्राचा अपमान लातूरकर कधीही सहन करणार नाही, भाजपवाल्यांनो याद राखा, करारा जवाब मिलेगा!

विलासराव देशमुख हे राज्याच्या राजकारणातील मोठे नेतृत्व होतं. लातूर म्हणजे विलासराव देशमुख असं समीकरण होतं. आता रवींद्र चव्हाणांनी त्यांच्या आठवणी पुसल्या जातील असं वक्तव्य केल्यानंतर त्यावर काँग्रेसमधून तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

मेळावा संपल्यानंतर रवींद्र चव्हाण यांनी माध्यमांशी बोलणे टाळत तात्काळ निघून जाणे पसंत केले. त्यामुळे विलासराव देशमुखांवर त्यांनी केलेल्या वक्तव्यावर अधिक खुलासा न झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला आणखी धार आली आहे. आता या वक्तव्यावर काँग्रेसकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

## मुंबईत २ कोटी ३३ लाखांची रोकड जप्त; निवडणूक भरारी पथकाची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सध्या राज्यात महापालिका निवडणुकांमुळे निवडणूक परिक्षेत्रात आचारसंहिता सुरू असल्याने भरारी पथकेही तैनात करण्यात आली आहेत. मुंबईसह महानगरात ही भरारी पथके संशियत वाहनांची तपासणी करत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी अनेक उमेदवार बिनविरोध झाल्याने आरोप पैशांचा वापर करुन, आमिष दाखवूनच हे उमेदवा बिनविरोध केल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळेच, निवडणूक काळात अवैधपणे पैशांची देवाण-घेवाण होऊ नये म्हणून निवडणूक आयोगाचे कर्मचारी डोळ्यात तेल घालून काम करत आहेत. त्यातच, मुंबईतील देवनार परिसरात भरारी पथकाने तब्बल २ कोटी ३३ लाख रुपयांची रोकड ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.



मुंबईच्या देवनार परिसरात निवडणूक भरारी पथकाकडून २ व्हॅनमधून २ कोटी ३३ लाखांची रोकड ताब्यात घेतली आहे. ही रोकड ढच् मध्ये भरण्यासाठी नेली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. या पैशांची माहिती आयकर विभागाला देण्यात आली असून त्याबाबतचा तपास आयकर विभाग करत आहे. सध्या ही रोकड देवनार पोलिसांकडे कस्टडी म्हणून ठेवण्यात आली असून ही रोकड कुठून कुठे नेली जात होती, याबाबत सविस्तर चौकशी केली जात आहे. दरम्यान, देवनार पोलिसांनी या घटनेची नोंद स्टेशनडायरीत केली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. आयकर विभाग या पैशांचा माग काढत आहे.

## संपादकीय....

## ‘बिनविरोधा’त लढाई

राज्यातील नगरपालिका निवडणुकानंतर आता महापालिका निवडणुकांमध्येही बिनविरोधचे वारे वाहिले असून भाजप-शिवसेना महायुतीच्या तब्बल ७० जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. या निवडीनंतर विरोधकांनी आक्षेप घेत न्यायालयात धाव घेतली आहे. ठाण्यातील मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी पत्रकार परिषद घेऊन ठाणे आणि कल्याण डोंबिवलीतील बिनविरोध निवडणुका ह्या धमक्या, पैशाचे आमिष देऊन करण्यात आल्याचे आरोप करत काही पुरावेही दिले आहेत. त्यानंतर, जाधव यांनी पुण्यातील विधिज्ञ ॲड. असीम सरोदे यांच्याशी फोनवरुन यासंदर्भात चर्चा केल्याचे स्वतः सरोदे यांनी सांगितले. तसेच, महापालिका निवडणुकांतील बिनविरोधप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांचा मला फोन आला होता, राज ठाकरे यांनी महापालिकेत बिनविरोध आलेल्या उमेदवारांबाबत नाराजी व्यक्त केल्याचं त्यांनी सांगितलं. न्यायालयातून याबद्दल तोडगा काढला पाहिजे, ६८ ते ७० जागा राज्यातून बिनविरोध झाल्या आहेत. ५० जागा भाजप, २० जागा शिंदे यांच्या आणि काही इतरही आहेत. महाराष्ट्राला या नवीन वर्षात राजकीय भ्रष्ट गिफ्ट मिळालं आहे. राज्य निवडणूक आयोगानेसुद्धा आता अशा जागांची चौकशी करायला सुरुवात केली आहे. स्थानिक पातळीवर, स्थानिक नेत्यांनी, स्थानिक विषयांना धरून निवडणूक लढवली पाहिजे. पण, स्थानिक हा शब्द त्यातून वगळला आहे. सोलापूरमधील मनसेचे नेते बाळासाहेब सरवदे यांचाही बिनविरोध, अर्ज माघारी घेण्यावरुन खून झाला आहे. त्यामुळे, निवडणूक आयोगाच्या आख्यारीत हा विषय न ठेवता उच्च न्यायालयात हा विषय गेला पाहिजे. महाराष्ट्रात नगरसेवकांची खरेदी-विक्री तयार झाली असून भ्रष्ट मार्गातून या निवडणुका होत आहेत का?

विशेष लेख – ६ जानेवारी – पत्रकार दिन

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे पत्रकारितेतील योगदान आणि आजच्या पत्रकारांची नैतिक जबाबदारी

६ जानेवारी हा दिवस राज्य मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सन १८३२ मध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. समाजाला दिशा देणे, सत्याचा शोध घेणे आणि समाजहितासाठी आवाज उठवणे ही पत्रकारांची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर आचार्य जांभेकरांचे पत्रकारितेमधील योगदान आणि आजच्या पत्रकारांनी पाळावयाची नैतिकता यांचा विचार करणे आवश्यक ठरते.

बाळशास्त्री जांभेकर यांचे पत्रकारितेतील महत्त्व:–

मराठी पत्रकारितेची सुरुवात: ६ जानेवारी १८३२ मध्ये त्यांनी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राने समाजजागृतीचे कार्य केले. दर्पण’च्या पहिल्या अंकात इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये माहिती दिली जात असे. यामुळे इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी व भावना समजून घेता आल्या. ’दर्पण’ने समाजातील अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुती यांविरुद्ध आवाज उठवला आणि लोकांना जागरूक केले. या वृत्तपत्राने साडे आठ वर्षे कार्य केले आणि १८४० मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. त्याच वर्षी त्यांनी दिग्दर्शन हे वृत्तपत्रही सुरू केले होते. मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू करून त्या माध्यमातून एतद्देशिय समाजाला प्रबोधित करण्याच्या केलेल्या कार्यामुळे त्यांना दर्पणकार म्हणून संबोधले जाते.

जांभेकरांनी पत्रकारितेद्वारे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अंधश्रद्धा, अज्ञान आणि सामाजिक कुप्रथांविरुद्ध त्यांनी लेखन केले. ब्रिटिश काळात त्यांनी लोकांना स्वातंत्र्य, न्याय आणि समानतेची जाणीव करून त्यांच्यामध्ये राष्ट्रीय चेतना जागृत केली. पत्रकारितेला त्यांनी सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले. त्यांच्या लेखनात सत्य, विवेक आणि समाजहित यांचा आग्रह होता. त्यामुळेच त्यांना मराठी पत्रकारितेचे जनक ही उपाधी मिळाली.

आजच्या पत्रकारांनी घ्यावयाची काळजी:–

आजच्या काळात पत्रकारिता



अधिक व्यापक झाली आहे. छापील माध्यमांबरोबरच दूरदर्शन, रेडिओ, डिजिटल पोर्टल्स आणि सोशल मीडिया हे नवे माध्यम उपलब्ध झाले आहेत. या बदलत्या परिस्थितीत पत्रकारांनी काही बाबींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे:

सत्यता आणि पडताळणी: बातमी देताना तथ्यांची पडताळणी करणे अत्यावश्यक आहे. अप्रमाणित माहिती किंवा अफवा पसरवणे टाळावे.

निष्पक्षता: कोणत्याही राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक दबावाला बळी न पडता निष्पक्ष वृत्तांकन करणे ही पत्रकाराची जबाबदारी आहे.

लोकहिताचा विचार: बातमी ही केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी नसून समाजहितासाठी असावी.

भाषेची शुद्धता: पत्रकारितेत वापरली जाणारी भाषा स्पष्ट, सोपी आणि शुद्ध असावी. चुकीची भाषा जनमनसात गोंधळ निर्माण करू शकते.

गोपनीयतेचा आदर: व्यक्तीगत गोपनीयता आणि संवेदनशील माहिती यांचा आदर राखणे आवश्यक आहे.

नवमाध्यमांचा जबाबदार वापर: सोशल मीडिया हे प्रभावी साधन आहे, परंतु त्याचा वापर करताना नैतिकता आणि जबाबदारी पाळणे गरजेचे आहे.

पत्रकारितेतील नैतिकता:–

पत्रकारितेची नैतिकता ही तिच्या विश्वासार्हतेचा पाया आहे.

सत्यनिष्ठा: पत्रकाराने सत्याला प्राधान्य द्यावे.

स्वतंत्रता: कोणत्याही दबावाखाली न येता स्वतंत्रपणे बातमी देणे.

उत्तरदायित्व: समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून कार्य करणे.

संवेदनशीलता: सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक बाबींमध्ये संवेदनशीलता राखणे.

लोकशाही मूल्यांचे संरक्षण: पत्रकारितेने लोकशाही मजबूत करावी, जनतेला माहितीपूर्ण करावे.

आजचा पत्रकार दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.आचार्य जांभेकर यांचे कार्य आजही प्रासंगिक आहे. त्यांच्या विचारधारेला आधुनिक पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात महत्त्व आहे. त्यांच्या कार्यामुळे पत्रकारितेत एक नैतिक आधार तयार झाला, जो आजही पत्रकारितेचा आधारभूत आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा पत्रकारितेतील वारसा आणि कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी पत्रकारितेला समाजजागृतीचे साधन बनवले. आजच्या पत्रकारांनी त्यांच्या आदर्शांचा विचार करून सत्यनिष्ठा, निष्पक्षता आणि समाजहित यांचा आग्रह धरावा. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, हा स्तंभ मजबूत राहणे, हे पत्रकारांच्या नैतिकतेवर अवलंबून आहे.

**– सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**सोलापूर**

# वैकुंठ एकादशी उत्सव उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : येथील श्री बालाजी मंदिरात वैकुंठ एकादशीचा उत्सव दिनांक ३० डिसेंबर मंगळवार रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. तिरुपती बालाजी प्रमाणे भगवान व्यंकटेश चे विविध उत्सवाने वातावरण भक्तीमय झाले.आपल्याकडे जी पुत्रदा एकादशी म्हणली जाते तिलाच दक्षिण भारतात वैकुंठ एकादशी या नावाने संबोधले जाते. तिरुपती येथे वैकुंठ एकादशी दरम्यान केवळ पास धारकांनाच दर्शन दिला जातो,बाकी इतर सर्वदर्शन या काळात बंद असतात.



सकाळी देवाचा भव्य अभिषेक व आरती करून भजन, नामस्मरण, व्यंकटेश स्तोत्र पठण करण्यात आले. सायंकाळी श्री बालाजी, भूदेवी व श्री देवी यांची आकर्षक पालखीमध्ये सजावट करून मंदिरा भोवती प्रदक्षिणा करण्यात आल्या.

या दिवशी मंदिराचे मुख्य द्वार बंद होते व वैकुंठ द्वार मधून प्रवेश करून दर्शन देण्यात आले..वैकुंठ एकादशीला वैकुंठ द्वारातून श्री वेंकटेशाचे दर्शन घेतल्यास वैकुंठप्राप्ती (मोक्ष )प्राप्त होतो अशी धार्मिक मान्यता आहे विष्णू पुराणानुसार, भगवान विष्णूंनी दोन राक्षसांसाठी वैकुंठाचे द्वार उघडले, कारण त्यांनीही असा वर मागितला होता की, जो कोणी त्यांची कथा ऐकेल आणि वैकुंठ द्वार नावाच्या त्या दारातून बाहेर येणाऱ्या भगवान विष्णूंची प्रतिमा पाहिल, त्याला वैकुंठ प्राप्त होईल. म्हणूनच, असा विश्वास आहे की या दिवशी विष्णू मंदिरे भक्तांना वैकुंठ द्वारातून जाण्यासाठी एक द्वार तयार करतात..

या उत्सवानिमित्त संपूर्ण मंदिराची आकर्षक फुलाद्वारे सजावट करण्यात आली. सायंकाळच्या प्रदक्षिणा आणि आरतीच्या समयी भाविकांची गर्दी आणि उत्साह उल्लेखनीय होता. साक्षात तिरुपतीप्रमाणेच कळंब येथील श्री बालाजी मंदिरात उत्सव साजरे होत असल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. श्री.राम प्रपन्नाचार्य रामानुजा आचार्य मुख्य पुजारी बालाजी मंदिर संस्थान कळंब यांनी सांगितले.

# आमदार मनोज कायंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री बळीराजा शेत–पाणंद रस्ते योजनासाठी प्रशासनाची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील शेतरस्त्यांची दुरावस्था दूर करून शेतकऱ्यांना बारमाही आणि मजबूत रस्ते उपलब्ध करून देणे हा आहे.



या योजनेची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे:

१. योजनेचे मुख्य उद्देश

बारमाही रस्ते: पावसाळ्यात चिखलामुळे शेतात जाणे कठीण होते, ते टाळण्यासाठी पक्के व मजबूत रस्ते तयार करणे.

वाहतूक सुलभता: पेरणी, मशागत, कापणी आणि तयार शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठी वेगवान वाहतूक व्यवस्था निर्माण करणे. अतिक्रमण मुक्त रस्ते: गाव नकाशावरील जुने रस्ते मोकळे करून त्यावरील अतिक्रमणे हटवणे. वाद मिटवणे: शेतरस्त्यांवरून होणारे शेजाऱ्यांमधील वाद कायमस्वरूपी निकाली काढणे.

२. योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये

१००% यंत्रांचा वापर: पूर्वी ही कामे मजुरांमार्फत (मनरेगा) केली जात होती, ज्यामुळे कामाची गती संथ होती. आता ही कामे पूर्णपणे यंत्राद्वारे (चरलहळपशी) केली जातील.

रॉयल्टी माफी: रस्ते बांधणीसाठी लागणारा गाळ, माती, मुरूम आणि दगडावर कोणतेही रॉयल्टी शुल्क (ठ्रेरश्रीं) आकारले जाणार नाही.

मोफत मोजणी व बंदोबस्त: रस्त्यांची मोजणी भूमी अभिलेख विभागामार्फत मोफत केली जाईल आणि गरज पडल्यास पोलिस बंदोबस्तही मोफत दिला जाईल.

वृक्षारोपण: रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वृक्षारोपण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

३. अंमलबजावणी आणि समिती

समिती: प्रत्येक विधानसभा मतदारसंघात आमदारांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली जाईल.

प्रक्रिया: पहिल्या ६ महिन्यांत रस्त्यांचे सीमांकन (ऊशारीलरींळेप) केले जाईल आणि त्यानंतर गाव नकाशा तयार करून तो ग्रामस्थांसमोर प्रसिद्ध केला जाईल. निधी: या योजनेसाठी मनरेगासह इतर १३ विविध सरकारी योजना आणि सीएसआर (उडठ) फंडातून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या रस्ते योजनेसाठी विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती गटित करण्यात येणार असून विधानसभा सदस्य हे या समितीचे अध्यक्ष असतील, उपविभागीय अधिकारी हे या समितीचे सचिव असतील, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, उप अधीक्षक भूमी अभिलेख,तालुका कृषी अधिकारी, विधानसभा क्षेत्रातील सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, उप अभियंता जिल्हा परिषद, पाच प्रगतशील शेतकरी हे सर्व या समितीचे सदस्य असतील. आजच्या बैठकीसाठी आमदार मनोज कायंदे, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, तहसीलदार सिंदखेडराजा अजित दिवटे, तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, गट विकास अधिकारी सिंदखेडराजा अजित बांगर, गटविकास अधिकारी देऊळगाव राजा मुकेश महोर, उपाधीक्षक भूमि अभिलेख सिंदखेडराजा मारुती थोरवे, तसेच इतर सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# चव्हाणवाडीत विकासाला गती! ‘ज्योतिबा मंदिराचा भव्य सभामंडप श्रद्धा–सुविधेचा संगम ठरेल : आमदार अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा/प्रतिनिधी : चव्हाणवाडी (टेंभुर्णी) येथील नांगरे वस्तीतील प्रसिद्ध ज्योतिबा मंदिराच्या नवीन सभामंडपाच्या उभारणीस आज अधिकृत सुरुवात झाली. आमदार निधीतून मंजूर झालेल्या १० लाख रुपयांच्या कामाचे विधिवत भूमिपूजन माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.



या प्रसंगी देवस्थानच्या वतीने आमदार अभिजीत पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्यासमवेत उपस्थित राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, माजी सरपंच प्रमोद कुटे तसेच डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन औदुंबर देशमुख यांचाही देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला.

भूमिपूजनप्रसंगी बोलताना आमदार अभिजीत पाटील यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, ज्योतिबा मंदिर परिसरात उभारला जाणारा हा सभामंडप केवळ बांधकाम नसून श्रद्धा, सुविधा आणि सामाजिक एकोपा यांचे प्रतीक ठरेल. या सभामंडपामुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांना देवदर्शनासाठी बसण्याची उत्तम व सुरक्षित सोय उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी चव्हाणवाडी गावातील स्मशानभूमीचा प्रश्न गांभीर्याने घेत असल्याचे स्पष्ट करत, हा प्रश्न येत्या दोन–तीन महिन्यांत निश्चितपणे मार्गी लावला जाईल, असे ठाम आश्वासन ग्रामस्थांना दिले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या अडचणी सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी ठासून सांगितले.

सदर कार्यक्रमादरम्यान नवनाथ शिंदे यांनी नव्याने खरेदी केलेल्या जेसीबी मशीनची पूजा आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

गावातील ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांना उद्देशून बोलताना आमदार पाटील म्हणाले की, साखर कारखाने सुरू होऊन ५० ते ५५ दिवस झाले असून पुढील किमान तीन महिने गाळप हंगाम सुरू राहणार आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने घाबरून जाऊ नये. या गावातील शेतकऱ्यांचा एक टिपर ऊसही शिल्लक राहणार नाही, असे ठाम आश्वासन त्यांनी दिले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन औदुंबर देशमुख, माजी सरपंच प्रमोद कुटे, अरुण चव्हाण, माजी सरपंच नवनाथ शिंदे, सुभाष इंदलकर, माजी सरपंच भागवत खडके, नागेश माळी, अनिल नांगरे, विजय कदम, जमाल काझी, सुधीर पाटील, नितीन चव्हाण (वायरमन), सुधीर नांगरे, मंगेश इंदलकर, शशिकांत नांगरे, युवराज मिस्किन, श्याम नांगरे, ज्योतीराम शिंदे, सचिन शिंदे, सागर चव्हाण, विष्णू महालिंगडे, सोमनाथ गायकवाड (वरवडे), संदीप कुटे, दत्तात्रय गायकवाड, निलेश पवार, गणेश नांगरे, नितीन नांगरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज नांगरे यांनी केले, तर आभारप्रदर्शन सुधीर नांगरे यांनी मानले.

# बजाज फायनान्स तर्फे दान उत्सव अंतर्गत एम.जे. प्रथम मानव सेवा संस्था, सोलापूर यांना जीवनावश्यक साहित्याची मदत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शहरातील गरजू, निराधार व बेघर बांधवांसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या एम.जे. प्रथम मानव सेवा संस्था, सोलापूर यांना बजाज फायनान्स तर्फे दान उत्सव उपक्रमांतर्गत सलग चौथ्या वर्षी अन्नधान्य व आवश्यक साहित्यांची मदत देण्यात आली. व या उपक्रमांतर्गत तांदूळ, गहू, तूर डाळ, तेल, व संपूर्ण किराणा साहित्य वंचित मुलांसाठी शालेय साहित्य तसेच घडवून करिता ब्लँकेट इत्यादी साहित्य संस्थेकडून सपोर्ट करण्यात आले. हे साहित्य संस्थेच्या माध्यमातून निराधार, निराश्रम, गरीब व गरजू नागरिकांपर्यंत पोहोचवले जाणार आहे संस्थेचे निस्वार्थी व साथीच्या पूर्ण सेवा कार्य लक्षात घेऊन बजाज फायनान्सचे सलग चौथ्यांदा या उपक्रमाचे सहकार्य केले.

या उपक्रमासाठी महेश जी झंपा, अंकुश सुसर पाटील, श्रीशैल बिराजदार, तसेच बजाज फायनान्सच्या सर्व मान्यवर टीमचे मोलाचे योगदान लाभले यावेळी बोलताना संस्थापक अध्यक्ष श्री एम .जे. मोहन तल गोकुळ यांनी सांगितले की गरजूंच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारी ही मदत आमच्यासाठी केवळ साहित्य नसून सेवेला मिळालेली प्रेरणा आहे. बजाज फायनान्सने दाखवलेले विश्वास आम्हाला अधिक जोमाने मानव सेवा करण्याची ताकद देतो एम जे प्रथम मानव सेवा संस्था सोलापूर शहरात गरीब गरजू निराधार, दिव्यांग व मनोरुग्णांसाठी, सातत्याने सेवा करत आहे मनसेवेत सहभागी सर्वांनी घ्यावा असे आव्हान केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापूरला दररोज पाणीपुरवठा अन् आयटी पार्क!

## सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी भाजपचा जाहीरनामा; प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहराला दररोज पाणी पुरवठ्यासाठी ८९२ कोटींची योजना पूर्ण करण्याला अन आयटी पार्क सुरू करण्याला भाजपाच्या जाहीरनाम्यात प्राधान्य देण्यात आले आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सोमवारी जामगोंडी मंगल कार्यालयात झाले.




याप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, भाजपाच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, भाजपा पूर्व जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, पश्चिम जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, सरचिटणीस प्रा. नारायण बनसोडे, शिवराज सरतापे, सुधा अळीमोरे, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विजय कुलथे उपस्थित होते.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, भारतीय जनता पार्टीने सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या जाहीरनाम्यातील प्रत्येक गोष्ट पूर्ण करण्याकरिता भाजपा कटिबद्ध आहे. सोलापुरात आयटी पार्कचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भाजपाकडून मागणी करण्यात येईल.

भाजपाच्या जाहीरनाम्यातील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे :

■ सोलापूर शहरासाठी पुढील १०० दिवसात १०० ई बस शहरातील रस्त्यांवर कार्यान्वित करणार.

■ धूळमुक्त सोलापूरसाठी अत्याधुनिक यंत्रणांच्या माध्यमातून शहर स्वच्छतेवर भर देणार.

■ प्रत्येक प्रभागात क्रीडांगणे उद्याने बांधणार.

■ हद्दवाढ भागात अत्याधुनिक रुग्णालये उभारणार.

■ महापालिकेच्या माध्यमातून आयुर्वेदिक उपचारदेखील जनतेला उपलब्ध करून देणार.

■ गुंठेवारीचा प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्य देणार.

■ शहरातील विविध भागात सुलभ सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारणार.

■ महिलांसाठी पिंक टॉयलेट उपलब्ध करून देणार.

■ हद्दवाढ भागात मराठी, इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या जातील.

■ प्रत्येक प्रभागात प्रभाग कार्यालय, एक खिडकी सेवा देणार.

■ कर प्रणालीत सुसूत्रता आणून नागरिकांवरील कराचा बोजा कमी करणार.

■ बांधकाम परवाना प्रक्रियेत सुलभता आणणार.

■ जन्म मृत्यू दाखले विभागीय कार्यालयातच मिळणार.

■ एमआयडीसीमध्ये सुविधा उपलब्ध करून देणार.

■ वस्त्रोद्योगाला चालना देणार.

■ सोलापूर ते तिरुपती, हैदराबाद, बंगळुरू विमानसेवा सुरू करणार.

■ विमानसेवेचा विस्तार करून बोरामणी कार्गो विमानतळ याद्वारे रोजगार निर्मिती करणार.

■ संविधान भवन बांधणार.

■ गर्दीच्या ठिकाणी नागरिकांच्या सोयीसाठी पार्किंग व्यवस्था करणार.

■ सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणार.

■ शहरातील झोपडपट्ट्यांचा योजनांद्वारे पुनर्विकास करणार.

■ उड्डाणपूल, अंडरपास व शहराभोवतालचा रिंग रोड पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार.

■ आदीला नदीचा प्रवाह रुंद करून शहरातील आणि शहरा भोवतालच्या नाल्यांचा विकास आराखडा राबवणार.

■ स्मशानभूमीचे आधुनिकीकरण, हद्दवाढ भागासाठी नव्या स्मशानभूमी तयार करणार.

■ पुण्यातील कात्रज येथील प्राणी संग्रहालयाच्या धर्तीवर सोलापुरातील प्राणी संग्रहालयाचे नूतनीकरण करणार.

■ नाट्यगृहांचे अत्याधुनिकीकरण करून हद्दवाढ भागात नवे नाट्यगृह, संगीत अकादमी उभारणार.

■ ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिर परिसर व तलावाचे सुशोभीकरण करणार.

■ धर्मवीर संभाजी तलाव स्वच्छ करून स्मृती उद्यान विकसित करणार.

■ लक्ष्मी मंडईसह इतर भाजी मंडई अधिक सक्षम करून नवीन भाजी मंडई उभारणार.

या जाहीरनाम्याच्या माध्यमातून भाजपने सोलापूरकरांना विकासाची साद घातली आहे. विकसित भारतासाठी विकसित सोलापूर हे ब्रीदवाक्य घेऊन भाजपा यंदा महापालिका निवडणुकीत जनतेसमोर जात आहे.

सोलापूर शहराचा संपूर्ण विकास करण्यासाठी भारतीय जनता पार्टी कटीबद्ध असून जाहीरनाम्यात दिलेली सर्व आश्वासने भाजपा पुन्हा सत्तेवर आल्यानंतर निश्चितपणे पूर्ण करेल, असे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

# श्री नामदेव पायरीचे दर्शन व पूजन करून डॉ. प्रणिता भालके यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिकेच्या नूतन नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.



पंढरपूर नगरपालिकेच्या सभागृहामध्ये जाऊन माजी आमदार भारत भालके यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. नंतर पत्रकारांशी बोलताना सर्वांना विश्वासात घेऊन विकास कामे केली जातील असे त्यांनी सांगितले.

पदभार स्वीकारताना जाताना सर्वप्रथम डॉ. प्रणिता भालके यांनी नामदेव पायरीचे पूजन करून दर्शन घेतले व तीर्थक्षेत्र विकास आघाडीची नगरसेवकासह पाई चालत नगरपालिकेकडे आल्या. नगरपालिकेत जाऊन तोच समाजसेवकांच्या यांच्या प्रतिमेचे व स्वर्गीय भारत नाना भालके यांच्या प्रतिमेचे पूजन करून तर नंतर त्यांनी नारळाचे पदाच्या दालनामध्ये जाऊन त्याने आपला पदभार स्वीकारला. नगर परिषदेचे मुख्य अधिकारी व श्री महेश रोकडे यांनी नगराध्यक्ष डॉ. भालके यांचा येतोचित सन्मान करण्यात आला यावेळी पत्रकारांशी बोलताना नगराध्यक्ष भालके म्हणाल्या पंढरपूर नगर परिषदेच्या तीर्थक्षेत्र विकास गाडीचा निवडणुकीमध्ये अजंठा जो जाहीर केला होता. त्या प्रमाणे सर्व कामे करण्यात येणार आहेत. तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगरसेवक व विरोधी नगरसेवक यांना विश्वासात घेऊन सौर व पंढरपूर शहराचा विकास करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. मनसे नेते दिलीप धोत्रे, भगीरथ भालके, सुधीर धोत्रे, विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वसामान्य नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यावर भर देण्यात येणार आहे. राजकारण केले जाणार नाही व पंढरपूर शहराचा विकास शहरातील नागरिकांनी मला भरभरून मते देऊन मोठ्या मताधिक्याने मला निवडून दिले आहे त्यांच्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही व शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वांना घेऊन शहराचा विकास करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भीम नगर नळदुर्ग येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /एस.के. गायकवाड) : तुळजापूर तालुक्यातील भीम नगर नळदुर्ग येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची १९५ वी जयंती मोठ्या उत्साहाने व विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.




या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्यापक एस.यू.शेख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले ) चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के. गायकवावाड, सामाजिक कार्यकर्ते अनंत बनसोडे हे होतों. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले यावेळी बोलताना एस.के. गायकवाड म्हणाले की महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षण चळवळीमुळेच या देशातील स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली त्यामुळेच आज महिला सर्व क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला 'खांदा लावून काम करत असताना दिसतआहेत.महात्मा फुले यांच्या शैक्षणिक चळवळीला संविधानाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी घटनात्मक अधिकार मिळवून दिला आहे त्यामुळे आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले यांच्या विचाराचा आदर्श समोर ठेवून शिक्षण घेऊन प्रत्येकाने आपली सर्वांगीण प्रगती साधण्याचा प्रयत्न करावा. याप्रसंगी अनंत बनसोडे यांचेही शुभेच्छा पर भाषण झाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन येथील सहशिक्षिका सुलक्षणा टिळक यांनी केले. यावेळी पालक सुनिता सावंत, आम्रपाली कांबळे,संध्या कांबळे, सुजाता कांबळे,नानिमा रोंगे, रूपाली सोनवणे,कुशालबाई बनसोडे विद्यार्थी उपस्थित होते.

# गुलाब गँग सिनेमा दाखवून सावित्रीबाई जयंती संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी




सावित्री महिला संघटनेच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. ओम पी थिएटर येथे शनिवारी दुपारी महिलांना 'गुलाब गँग हा चित्रपट दाखवण्यात आला. संघटनेचा विस्तार वर्धापन दिन साजरा झाला प्रमुख पाहुणे म्हणून हिराचंद नेमचंद वाचनालयाचे कार्यवाह श्रीकांत येळेगावकर, कवी माधव पवार अँड नीला मोरे, साहित्यिक दत्ता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. उत्तर प्रदेशातील बांधा जिल्ह्यातील गुलब्यांग या महिला संघटनेची सुरुवात झाली व गुलाबी साडी नेसून व हातात काठी घेऊन या महिला स्त्रियांवर होणाऱ्या अन्य अत्याचाराविरुद्ध आवाज उठवण्यात प्रत्यक्ष कृतीही करतात हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार यांचा एकजुटीने प्रतिकार करतात कमजोर व मजबूत महिलांना हिम्मत देतात, गुलाब यांचे नाव ऐकताच गुंड व शोषण करण्याचे धावेदनांनी अशा सत्य कथेवर आधारित हा सिनेमा होता व स्त्रियांमध्ये आत्मसमान व स्वाभिमान जागृत करणारा हा सिनेमा बघण्यास महिलांना मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रेरणादायी चित्रपट गुलाब हा चित्रपट महिलांना दाखवण्यात आला याची सगळ्यांनी कौतुक केले व सूत्रसंचालन लता ढेरे यांनी केले. सुमित्रा देशमुख व आदींनी भोसले यांनी चित्रपटाबद्दल माहिती दिली व प्रस्तावना फर्जना शेख यांनी केले व सुजाता फडतरे यांनी संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन केले.

# मंद्रूप येथे प्रथमच १३ ते १५ जानेवारीला कृषी प्रदर्शनाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : मुद्रुप येथील ग्रामदैवत श्री माळसिद्ध यात्रेनिमित्त १३ ,१४व व १५ जानेवारी २०२० च्या दरम्यान प्रथम तीन दिवशी जिल्हास्तरीय कृषी आणि पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनामध्ये नामवंत कृषी कंपन्या सहभागी होणार असून यासाठी भव्य मंडप उभारण्याच्या कामास सुरुवात झाली आहे.



यावेळी मैदानाची पूजन श्री माळ सिद्ध देवस्थानचे मदगीचे पुजारी जैनसिद्ध पुजारी तसेच श्री माळसिद्ध देवस्थान ट्रस्ट व यात्रा कमिटीचे अध्यक्ष अँड राजेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यावेळी बोलताना श्री माळसिद्ध देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख म्हणाली, दरवर्षी १२ ते १६ जानेवारी असे पाच दिवस माळसिद्ध यात्रा संपन्न होते पाच दिवस विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम चे आयोजन केले जाते यावर्षीही माळसिद्ध यात्रेनिमित्त तीन दिवशीय शेतकरी बांधवांना कृषी प्रदर्शनाची तसेच अक्षदा सोहळ्याच्या दिवशी लक्ष दिपोत्सव सोहळ्याचे आयोजन कर करावेत अशी सूचना पत्रकार पंचायत श्री स्वामी यांनी यात्रेच्या नियोजन बैठकीमध्ये केले होते त्यानुसार शेतकरी बांधवांसाठी माळसिद्ध यात्रा कमिटीने यंदा कृषी प्रदर्शनाची आयोजन केले आहे. शेतकऱ्यांना विविध शेतीपूरक तांत्रिक अवजारे यंत्रसामग्री माहिती व्हावी नवनवीन पीक पद्धती आधुनिक व सेंद्रिय शेती कशी करावी, त्याची माहिती व शेतकरी बांधवांना या कृषी प्रदर्शनात मिळणार आहे या प्रदर्शना वळू गाई बैल म्हैस गोडे शेळी आदींचे पशुप्रदर्शन होणार आहे प्रदर्शनासाठी पत्र्याचे भव्य मंडप हिरवे हाय मस्त देवे, विविध कंपन्यांसाठी मोठे स्टॉल पाणी सुरक्षारक्षक, अग्निशामक दल, रुग्णवाहिका यासह इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहे प्रदर्शन पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी शेतकरी बांधवांसाठी मोफत आरोग्य आणि नेत्र तपासणी करून औषधोपचार करण्यात येणार आहे. प्रदर्शनामध्ये उद्घाटन विविध राजकीय मान्यवर व शासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे अशी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी नागरिकांच्या सहकार्याने ही कृषी प्रदर्शन यशस्वी करू असा विश्वास देशमुख यांनी व्यक्त केला यावेळी माळशुद्ध देवस्थान यात्रा कमिटीचे अध्यक्ष अँड राजेश देशमुख माजी सभापती गुरुसिद्ध मेहेत्रे, तमन्ना पुजारी, पत्रकार पंचाक्षरी स्वामी बाबासाहेब देशमुख, सुनील होनमाने बेसिद्ध सुंटे राधाकृष्ण गोसावी रविशंकर मेहेत्रे, राजेश नवले अनंत मेहत्रे चंद्रकांत देशमुख बाबूशा शेंडगे सुरेश टिळे, अविनाश देशमुख सोमलिंग पुजारी बनसिद्ध पुजारी बेळणी पुजारी शिवानंद पुजारी अनिकेत पाटील सिकंदर आवटे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.


शहरातील प्रमुख मार्गावरून निघाली मिरवणूक

भाविकांची दर्शनासाठी गर्दी

# नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण यात्रा पालखी सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे पुरातन हेमाडपंथी असलेल्या सूर्यनारायण देवाची यात्रा मोठ्या उत्साहात सुरू असून या यात्रेसाठी संपूर्ण राज्यातून हजारो भावी दर्शनासाठी येत असतात





पौष महिन्यातील प्रत्येक रविवारी मोठ्या उसात यात्रा भरते या यात्रेमध्ये सर्व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते त्यातच पौष महिन्यातील तिसऱ्या रविवारी सूर्यनारायण देव यात्रा पालखी सोहळा मोठ्या दिमाखात साजरा केला जातो. यावेळी पहाटे पाच वाजता महापूजा माजी सरपंच बळवंत धनवडे सौ सोनाली धनवडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाली.

सकाळी आठ वाजता पालखी पादुका पूजन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्राध्यापक दत्तात्रय मस्के सौ. सुरेखा मस्के, माजी सरपंच नितीन मस्के सौ. राजश्री मस्के यांच्या हस्ते पादुका पूजन करून पालखी मिरवणुकीस गावातील प्रमुख मार्गावरून सुरुवात झाली.

यावेळी पालखीचे भव्य स्वागत सर्व ग्रामस्थांच्या वतीने चौका चौकात मोठ्या उत्साहात साजरे केले जाते .यावेळी मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती असते.

यावेळी गावातील प्रमुख पालखी मार्गावरील चौकात भजन, भारुड ,विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

यावेळी नारायण चिंचोली च्या सरपंच नर्मदा लक्ष्मण धनवडे, उपसरपंच गहिनाथ चव्हाण, भाजपा राज्य कार्यकारणी सदस्य लक्ष्मण तात्या धनवडे, तंटामुक्त अध्यक्ष विजय कोळेकर, माजी सरपंच विठ्ठल माने, चेअरमन विष्णू माने , व्हा. चेअरमन श्रीधर कोळेकर, सोसायटी सदस्य ज्ञानेश्वर मस्के , ज्ञानेश्वर बर्डे , शिवलिंग हिंगमिरे, शिवाजी वसेकर ,सूर्यनारायण देव ट्रस्ट संचालक आप्पासाहेब वाघमोडे ,रमेश नाझरकर , हनुमंत गुंड,अमोल गुंड ,सुनील माने , हरिभाऊ माने ,नारायण गुंड, चंद्रकांत पाटील, पोपट पाटील ग्रामपंचायत सदस्य संतोष चव्हाण , नवनाथ कोले ,सोसायटी सदस्य बापूराव कोले, परमेश्वर गुंड, प्रशांत नलवडे ,ज्ञानेश्वर वाघमोडे, नितीन गुंड ,वैजनाथ मस्के, संतोष मस्के ,श्रीमंत कोळेकर ,मनोज मस्के, जनार्दन कंदारे, हनुमंत खरात ,श्रीधर कोळेकर, राजाभाऊ वाघ, सुरज पासले, विशाल चव्हाण , पंकज देवकते ,परमेश्वर बर्डे ,सचिन घाडगे ,नारायण गुंड, अमोल हाडमोडे मुकुंद घाडगे ,अभिजीत कवडे, दत्तात्रय बनसोडे, बाबा मुलानी ,महेश माने , परमेश्वर कोळेकर,तानाजी वसेकर, संदीप हिंगमिरे ,नितीन गुंड, अभिजीत कोले, बापूराव वसेकर ,दत्तात्रय बनसोडे, नितीन हिंगमीरे ,नागनाथ आहेर आदी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपा उमेदवारांनी प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचवावीत पक्षाची ध्येयधोरणे

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आवाहन : भाजपाच्या उमेदवारांची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर : प्रतिनिधी



महानगरपालिका निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी प्रत्येक मतदारांपर्यंत भाजपाची ध्येय धोरणे संपर्काच्या माध्यमातून पोहाचवावीत, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

महापालिका निवडणुकीसंदर्भात पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शनिवारी हॉटेल बालाजी सरोवर येथे उमेदवारांच्या बैठक घेऊन चर्चा केली. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, भाजपाचे पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी आमदार दिलीप माने, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस मनीष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, भारतीय जनता पार्टी पूर्ण ताकतीने सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक लढवत आहे. अशावेळी भाजपाच्या उमेदवारांनी प्रभागांमध्ये अधिकाधिक व्यक्तींशी संपर्क साधून भारतीय जनता पार्टीला विजयी करण्याचे आवाहन करावे. भाजपाने राज्यात आणि केंद्रात केलेल्या विकासकामांची तसेच सोलापूर शहरात झालेल्या धुळमुक्त सोलापूर, पाणी पुरवठ्यासाठी ८९२ कोटी रुपये, विमानसेवा, आयटी पार्क, लाडकी बहीण योजना अशा विकासकामांची माहिती नागरिकांना भेटून द्यावी. केंद्रात, राज्यात सत्ता असल्याने सोलापूरला भरघोस निधी देता येईल. राज्य तसेच केंद्राच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्वतंत्र गट तयार करावेत. सोशल मीडियावर अधिकाधिक सक्रिय रहावे. मतदार यादीतील प्रत्येक मतदारापर्यंत उमेदवार आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पोहचावे.

यावेळी भाजपाचे पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. श्री. देशपांडे यांनी यावेळी कार्यकर्त्यांना बूथरचना, संपर्क, हिशोब प्रचार आदी विषयात नेटके कार्य करावे, असे सांगितले. सोलापूर महानगरपालिकेची यंदाची निवडणूक ही भाजपासाठी प्रतिष्ठेची आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी लागणारी सर्व तांत्रिक प्रक्रिया उमेदवारांनी पूर्ण करावी. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी शहरवासीयांनी भाजपच्या पाठीशी रहावे यासाठी उमेदवारांनी प्रयत्न करावेत, असेही श्री. देशपांडे याप्रसंगी म्हणाले. यावेळी भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पंढरपूर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक १८ जानेवारी पूर्वी निवड होणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर प्रतिनिधी

पंढरपूर नगर परिषदेची लोकतूद निवडणूक पार पडली आता उपनगराध्यक्ष पदाची निवड १८ जानेवारी पूर्वी करण्यात येणार आहे ही निवडणूक नगरसेवकांमधून होणार आहे.. हात उंच करून मतदान घेतले जाणार आहे. पंढरपूर नगरपरिषदेच्या उपनगर ते चपाती कोणाची निवड होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. सौ प्रणिता भालके विजयी झाले असून त्यामुळे कुमार आशीर्वाद यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता भालके यांना पदभार स्वीकारण्याच्या सूचना दिल्या आहेत. १८ जानेवारी पूर्वी उपनद्या पदाची निवडणूक करावी आणि तदनंतर २० जानेवारी रोजी विभागीय समित्या स्थापन कराव्या अशी निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे पंढरपूर उपनगराध्यक्षनिवडणूक केव्हा होणार. उपनगरध्यक्षपदाची कोणाची निवड होणार याची उत्सुकता लागली आहे पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीम ध्ये परिचर गटाला २४ नगरसेवक, तर तीर्थक्षेत्र विकास आघाडीला, अकरा नगरसेवक मिळाल्या आहेत तर एका जागेवर अपक्ष नगरसेवक विजयी झाले आहेत. त्यामुळे उपनाराध्यक्षपदी भाजपचा उपनगरीत होणार आहे हे निश्चित झाले आहे. त्यामुळे उपनगराध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याकडे नगरवासी यांचे लक्ष लागले आहे.



### हात उंच करून मतदान होणार

२० जानेवारी रोजी विविध समित्यांची स्थापना होणार आहे. यामुळे सभापतीपदी ही कोणाची वर्णी लागणार याकडे उत्सुकता लागली आहे. यासाठी अनेकांनी सोलापूर जिल्ह्याची पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्याशी संपर्क सुरू केला असल्याचे दिसून येत आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी तीर्थक्षेत्र विभाग आघाडीचे यांनी डॉ. सो प्रणिता भालके, व तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नेते भगीरथ भालके यांच्याशी संपर्क सुरू केल्याची दिसून आले आहे. एकादरीत लवकरच पंढरपूर नगरपालिकेचे सर्वसाधारणल सभा लवकरच होणार आहे. सदर सभेकडे नगरवासी यांचे लक्ष लागले आहे.

### राष्ट्रीय सेवा योजना सेवा-संस्कार शिबिर

# वचन साहित्य, साहित्यविश्वाचा मुकुटमणी : शिवानंद गोगांव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/अक्कलकोट




मानव जातीच्या उत्थानासाठी वचने लिहिली आहेत. त्यात जीवनमूल्ये असतात. १२व्या शतकात बसवदी शरण यांनी लिहिलेल्या वचने आजही प्रकाशमान आहेत. त्यामुळे वाचन साहित्याला साहित्यविश्वाचा मुकुटमणी म्हटले जाते, असे प्रतिपादन ग्लोबल लिंगायत महासभेचे सोलापूरचे अध्यक्ष शिवानंद गोगाव यांनी केले.

शनिवारी, तालुक्यातील शिरवाळा येथील महाविद्यालयातील वरिष्ठ आणि कनिष्ठ विद्यार्थ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि अक्कलकोट येथील सी.बी. खेडगी महाविद्यालय यांच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय सेवा-संस्कार शिबिरात 'वाचन साहित्य' या विषयावर व्याख्यान देताना ते म्हणाले की, बसवादी शरण यांनी कन्नडमध्ये लिहिलेल्या वचन साहित्याचे अद्वितीय साहित्य आज देशी-विदेशी भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे जीवन सुंदर बनवण्यासाठी आणि त्यांच्या आकांक्षा त्यांच्या जीवनात साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून वचनांचा अभ्यास करावा, असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली.

खेदगी महाविद्यालयाचे भूगोल विभागाचे डॉ. भैरप्पा कोनाडे यांनी शिबिराचे अध्यक्षपद भूषवले आणि सांगितले की, विद्यार्थ्यांनी अशा शिबिरांमध्ये एकता आणि सेवा शिकली पाहिजे. त्यांनी येथे मिळवलेले ज्ञान आयुष्यभर सोबत घेऊन जावे.

अक्षरा अव्वा सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला प्रार्थना करून व्याख्यान कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

आयोजक प्रा. प्रकाश सुरवसे यांनी भाषण केले आणि सांगितले की, चेरामन बसवलिंगप्पा खेडगी यांच्या सहकार्याने आणि प्राचार्य डॉ. गुरलिंगप्पा धाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर २९ डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी विविध विषय, व्याख्याने, चर्चा, गट चर्चा, श्रमदान, वृक्षारोपण, पठणनाट्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. हिरी-किरी महाविद्यालयातील एकूण १५० विद्यार्थ्यांनी शिबिरात भाग घेतला.

महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. वैदेही वैद्य, प्रकल्प प्रमुख डॉ. गणपतराव कलशेट्टी, डॉ. सीडी अनेकर, प्रा. डीसी कोरे, प्रा. सिद्धराम पाटीला, प्रा. एमआर गौरा, प्रा. गुरुवा, प्रा. महामने, प्रा. एस.जे. पाटीला आणि इतर उपस्थित होते. जर प्रा. प्रकाश सुरवसे यांनी कार्यक्रम सादर केला नाही तर प्रा. सिद्धराम पाटीला यांनी त्यांचे आभार मानले.

# आ. पाटील यांच्या उपस्थितीत किशोर मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी



आज करमाळा येथे आमदार नारायण पाटील यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्या वतीने तालुकास्तरीय किशोर मेळावा पार पडला यावेळी उपस्थित राहून प्रतिनिधी पूजन केले.

त्या कार्यक्रमानिमित्त बोलताना आमदार नारायण पाटील मनाली की, सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या शिक्षिका आणि समाज सुधारक होत्या, त्यांनी पती ज्योतीराव फुले यांच्यासोबत स्त्री शिक्षणाची मुहूर्तमे ठरवली त्याचबरोबर पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि विधवा पुनर्विवाह साठी लढा दिला,

व महिला सक्षमीकरण व शिक्षणाचे महत्त्वपू कार्य केले म्हणून सावित्रीबाई फुले यांना क्रांतीज्योती म्हणून ओळखले जाते असेही आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले यावेळी मान्यवरांचे स्वागत गटशिक्षणाधिकारी नितीन कदम यांनी केले.

या कार्यक्रमासाठी समितीचे माजी सभापती अतुल पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी संचालक देवानंद बागल, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉक्टर अमित कदम, विस्तार अधिकारी मिनीनाथ टकले गटशिक्षणाधिकारी नितीन कदम शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत नलावडे व करमाळा तालुक्यातील किशोरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# घर घर संविधान संकल्पनेतून युवकांमध्ये घटनात्मक जागृती

पुणे /प्रतिनिधी : राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा - २०२५/२६ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत ऑनलाईन स्वरूपात १५ दिवसांचे प्रशिक्षण राबविण्यात येणार असून, सहभागी होण्यासाठी १० जानेवारी २०२६ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. हा राज्यस्तरीय उपक्रम महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग यांच्या वतीने राबविण्यात येत असून, भारतीय संविधानातील मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्यांची जाणीव युवकांमध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. युवकांनी संविधान समजून घेऊन जबाबदार, सजग आणि लोकशाही मूल्यांवर आधारित नागरिक म्हणून घडावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि महिलांच्या सन्मानावर आधारित राज्यकारभारातून प्रेरणा घेऊन हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सामाजिक समता व न्यायाची मूल्ये संविधानाच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यामागे आहे. घर घर संविधान या संकल्पनेतून ही जनजागृती चळवळ राज्यातील प्रत्येक घरापर्यंत व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. ही प्रश्नमंजुषा महाराष्ट्र राज्यातील इयत्ता ८ वी ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खुली असून, संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. १२ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून ऑनलाईन प्रशिक्षणास प्रारंभ होईल. प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर येथील तज्ज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करणार असून आवश्यक अध्ययन साहित्य ऑनलाईन उपलब्ध करून दिले जाणार आहे. ही स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन भाषांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (प्रॉक्टरिंगसह) परीक्षा घेण्यात येईल. सहभागासाठी केवळ ₹९९/- इतके नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये यशस्वी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली असून -

प्रथम पुरस्कार - रु. १,००,०००, द्वितीय पुरस्कार - रु. ५१,०००, तृतीय पुरस्कार - रु. ११,०००

यासोबतच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिकांसह प्रमाणपत्रे देण्यात येणार असून, सहभागी सर्व विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (बार्टी), पुणे यांच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

हा उपक्रम आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विभाग, इतर बहुजन कल्याण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (बार्टी), पुणे तसेच युवा करिअर क्लब यांच्या संयुक्त सहकार्याने राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाची संपूर्ण माहिती, नोंदणी प्रक्रिया व अधिकृत सूचना ूर्रिलरीशशी. लो या संकेतस्थळावर उपलब्ध असून, नागरिकांनी कोणत्याही अनधिकृत किंवा बनावट संकेतस्थळाला बळी न पडता केवळ अधिकृत संकेतस्थळावरूनच नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

संविधानाची मूल्ये आत्मसात करून सक्षम, जागरूक आणि जबाबदार नागरिक घडविण्याच्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (बार्टी), पुणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### स्वेरीत विज्ञान प्रदर्शनाचे थाटात उदघाटन

### उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे यांचे प्रतिपादन

# विज्ञान ही जीवनाची गुरुकिल्ली बनली पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- 'शासनाची ध्येय-धोरणे ही समाजाच्या उन्नतीसाठी असतात. विद्यार्थ्यांनी आपली सृजनशीलता वापरून नवनिर्मिती केली पाहिजे कारण विद्यार्थ्यांमध्ये दडलेले सुप्त गुण हे सादरीकरणाच्या माध्यमातून समाजमनावर दिसून येत असतात. प्रकल्प कदाचित छोटा असेल मात्र त्यातून मोठा संदेश जगाला मिळतो. या प्रकल्पांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर अशक्य असे काहीच नाही. या देशाला सुरवातीपासून अध्यात्माची परंपरा आहे आणि अध्यात्म हे विज्ञान आहे म्हणून विज्ञान ही जीवनाची गुरुकिल्ली बनली पाहिजे.' असे प्रतिपादन सोलापूर जिल्ह्याचे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रकाश नांगरे यांनी केले.

राज्य विज्ञान संस्था, रविनगर, नागपूर व शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये आयोजिलेल्या '५३ व्या सोलापूर जिल्हा स्तरीय बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनी २०२५-२६' चे उदघाटन सोलापूर जिल्ह्याचे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रकाश नांगरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. दि.५ व दि.६ जानेवारी २०२६ या दोन दिवशी स्वेरीत सोलापूर जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दिपप्रज्वलनानंतर महाराष्ट्र राज्य विज्ञान महामंडळाचे संचालक लक्ष्मीप्रसाद मोहिते यांनी प्रास्तविकात 'स्वेरीत आयोजिलेल्या या विज्ञान व गणित प्रदर्शनासंबंधी सविस्तर माहिती देवून वेळोवेळी विज्ञान प्रदर्शन भरविले पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढीस लागेल' असे सांगितले. स्वेरीने केलेल्या नियोजनाचे त्यांनी कौतुक केले. पंढरपूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे म्हणाले की, 'अपुऱ्या साधनामधूनही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून भविष्यात शास्त्रज्ञ तयार करावेत आणि या विद्यार्थ्यांमधूनच भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम, अंतराळकन्या सुनिता विल्यम्स व कल्पना चावला असे थोर शास्त्रज्ञ तयार होतील.' उच्च माध्यमिकचे शिक्षण सहनिरीक्षक अनिल बनसोडे म्हणाले की, 'विज्ञान अंगीकारण्यासाठी नैतिकता असावी लागते आणि नैतिकता असेल तर विज्ञानाचा वापर आपण सकारात्मक कार्यासाठी करू शकतो. कारण साध्या साध्या गोष्टीत मोठ्या गोष्टी दडलेल्या असतात.' अध्यक्षस्थानावरून बोलताना स्वेरीचे सचिव डॉ.सुरज रोंगे म्हणाले की, 'आपल्या कार्यात संयम, कष्ट आणि सातत्य ठेवल्यास पुढे व्हीआयटी, एनआयटी मधील विद्यार्थ्यांशी आपण स्पर्धा करू शकतो. स्पर्धेत प्रकल्प सादर करताना जिंकलो तर उत्तमच आहे पण त्यापेक्षाही स्पर्धेत सहभाग घेणे हे फार महत्वाचे आहे. त्यामुळे जीवनाला योग्य दिशा मिळते.' या प्रदर्शनात प्रत्येक तालुक्यातील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्या प्रकल्पांचा समावेश केला असून यातून विजेत्या होणाऱ्या तीन प्रकल्पांची राज्यस्तरीय स्पर्धेत निवड होणार आहे. या प्रदर्शनात पहिल्या दिवशी सायंकाळपर्यंत सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून जवळपास १२४ प्रकल्पांची नोंद झाली असून आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स हॉलला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यातून उत्कृष्ट प्रकल्पाचा नंबर काढण्यासाठी परीक्षकांना तारेवरची कसरत करावी लागणार, हे मात्र नक्की. प्रदर्शनासाठी बाहेरून आलेल्या विद्यार्थी व शिक्षकांसाठी नाश्ता, भोजन व निवासाची सोय उत्तमप्रकारे केल्याचे दिसून आले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू चव्हाण, जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष व सहसमन्वयक संजय जवंजाळ, नीलकंठ लिंगे, वरिष्ठ लिपिक मनोज साबळे, विश्वास नागणे व विज्ञान मंडळाचे पदाधिकारी तसेच स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे कॅम्पस इनचार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, प्रा. ए.एस. भातलवंडे आदी प्राध्यापक उपस्थित होते. उदघाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश लटके यांनी केले तर आभार जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष व समन्वयक संजय भस्मे यांनी मानले. उद्या (दि.६ जानेवारी) रोजी समारोप असून यासाठी सोलापूर जिल्हापरीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम हे प्रमुख पाहुणे असणार आहेत.

